# बीडमध्ये बोगस बिले देणारे औरंगाबाद-गुजरातचे रॅकेट सक्रीय

## बीड जिल्ह्यात बनावट एजन्सी व ट्रेडर्सचे बिले आणून देणारे एजंट

### कोट्यवधी रुपयांची जीएसटी बुडीत खात्यात, टॅक्स विभागातील अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज

**जीएसटीच्या कचाट्यातून वाचण्यासाठी गुत्तेदारही या षडयंत्रात सामील, बनावट एजन्सी व ट्रेडर्समधून फक्त बिलाची उलाढाल, या एजन्सी व ट्रेडर्समधून कोणतीच खरेदी होत नाही**

**बनावट एजन्सी व ट्रेडर्समधून सिमेंट आणि स्टील खरेदी झाल्याचे मोठ्या प्रमाणात बोगस बिले निघाल्याची शंका**

**मनसेचे राज्यउपाध्यक्ष अशोक तावरे यांनी दिलेल्या त्या सोळा एजन्सीच्या चौकशीचे काय? केंद्र टॅक्सविभागाने लक्ष देण्याची गरज**

बीड । दिव्य रिपोर्टर

गोरगरीबांचे कागदपत्रे मिळवून त्यांच्या नावाने ट्रेडर्स, एजन्सी सुरू करून त्या माध्यमातून गुत्तेदारांना बोगस जीएसटी बिले देवून कोट्यवधी रुपयांची जीएसटी बुडविण्याचे षडयंत्र उघडकीस आलेले होते. बीड-औरंगाबाद येथील टॅक्स विभागातील अधिकाऱ्यांनी या प्रकरणी पाठपुरावा करून अशा बनावट एजन्सी, ट्रेडर्सवर मोठ्या प्रमाणात कारवाई करून लाखो रुपयांचा दंड वसूल केला. ज्यांच्यावर दंडात्मक कारवाई झाली किंवा असे बोगस एजन्स, ट्रेडर्स निदर्शणास आले ते ट्रेडर्स, एजन्सी सध्या बंद झाले असले तरी काही एजन्सी ट्रेडर्स आजही सर्रास सुरू आहेत. या प्रकरणी मनसेचे राज्यउपाध्यक्ष अशोक तावरे यांनी अशा बोगसगिरी करणाऱ्या सोळा एजन्सी, ट्रेडर्सची लेखी तक्रार टॅक्स विभागाकडे दिलेली असताना अद्यापही याप्रकरणी टॅक्स विभागातून कोणतीच कारवाई झाली नाही. विशेष म्हणजे अशोक तावरे यांनी दिलेल्या तक्रारीत त्या एजन्सी, ट्रेडर्सच्या नाव व जीएसटी क्रमांकासहीत ही तक्रार दिलेली आहे तर मग अधिकाऱ्यांनी या गंभीर प्रश्नाकडे का दुर्लक्ष केले? हा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होत असून आता बीडमध्ये बोगस बिले देणारे एजंट सक्रीय झाले असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे हे एजंट औरंगाबाद येथून बोगस बिले आणून टक्केवारीवर विक्री करत असल्याची शंका व्यक्त केली जात असून या बोगसगिरीत गुत्तेदारही सामील असल्याचे दिसून येत आहे. बोगस जीएसटी बिलेप्रकरणाची कडी औरंगाबाद ते गुजरात अशी जुळत असून टॅक्स विभागाने जर या प्रकरणाकडे दुर्लक्ष केले तर केंद्रातील टॅक्स विभागाने याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.



शासकीय कामे केल्यानंतर गुत्तेदारांना जीएसटी अदा केलेले बिले शासनाकडे सादर करावी लागतात. यासाठी काही गुत्तेदार बनावट एजन्सी व ट्रेडर्सकडून अशाप्रकारे जीएसटी अदा झालेले बिले घेवून शासनाकडे दाखल करतात. अशाप्रकारे यातून शासनाचीही फसवणूक होत असून बनावट बिले आणून देण्यासाठी बीडमध्ये काही एजंट सक्रीय झाले आहेत. हे एजंट औरंगाबादच्या एजन्सी, ट्रेडर्समधून हे बिले आणून टक्केवारी घेवून (पान २ वर)

### टॅक्स विभागाचे दुर्लक्ष; केंद्रातील पथकाने लक्ष देण्याची गरज

मनसेचे राज्य उपाध्यक्ष अशोक तावरे यांनी सोळा एजन्सीच्या नावाने जीएसटी नंबरसहीत तक्रार दिलेली आहे. कदाचित यातील काही फर्म ओरिजनल असतील. परंतु चौकशी करणे हे टॅक्सविभागाचे कर्तव्य आहे. तसेच बीडमध्ये बोगस बिले देणारे काही एजंट सक्रीय असून औरंगाबाद-गुजरात अशी बोगस बिले देणाऱ्यांची लिंक जुळत आहे. या दृष्टीकोनातून दररोज बोगस बिलाच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची उलाढाल सुरू असून टॅक्सविभाग मात्र याकडे दुर्लक्ष करताना दिसून येते. या बोगसगिरीकडे टॅक्सविभाग का दुर्लक्ष करते? टॅक्स विभागातील काही अधिकाऱ्यांना या प्रकरणाची माहिती असतानाही याकडे गांभीर्याने का पाहिले जात नाही? अशीही शंका व्यक्त केली जात असून केंद्रातील टॅक्सविभागाने याकडे लक्ष देणे गरजेचे वाटते.

### गुत्तेदारांनी सावध राहण्याची गरज

बनावट फर्मच्या माध्यमातून बोगस बिले देणारे रॅकेट मोठ्या प्रमाणात सक्रीय झालेले आहेत. यात काही शासकीय गुत्तेदार गुंतलेले असून जीएसटी बुडविण्याचे मोठ्या प्रमाणात षडयंत्र सुरू असल्याचे यातून दिसून येते. यासाठी काही गुत्तेदारांनी बनावट फर्मपासून सावध राहण्याची गरज आहे. मनसेचे राज्य उपाध्यक्ष यांनी मागील काही दिवसांपूर्वी १६ बनावट फर्मचे नाव जीएसटी नंबरसहीत तक्रार केलेली असून टॅक्स विभागाने या तक्रारी अर्जाची गांभीर्याने दखल घेतली तर अनेक गुत्तेदार अडचणीत येण्याची शक्यता दर्शवली जात आहे.


सत्यमेव जयते

https://epaper.divyaaadhar.com

साप्ताहिक

# दिव्य आधार




**ग्राऊंड रिपोर्टींग** पान ४ वर


संपादक : शेख रिजवान

मो. 9561840184 rizwanshaikhekmat33@gmail.com



बीड वर्ष १२ वे, अंक ५०, सोमवार, दि. १८ ऑगस्ट २०२५ RNI/MAHMAR/2013/54433 पाने-४ किंमत १ रुपया


# बाळाच्या मांडीत डोस देताना तुटलेली सुई तब्बल सहा महिन्यानंतर शस्त्रक्रिया करून काढली

**माजलगाव ग्रामीण रुग्णालयाचा हलगर्जीपणा उघड, संबंधितांवर कारवाई करण्याची गरज; पालकांनी मानले जिल्हा रुग्णालय प्रशासनाचे आभार**



बीड । दिव्य रिपोर्टर

प्रसूती झाल्यानंतर बाळाला वेळोवेळी डोस द्यावे लागतात. यासाठी पालक विशेष काळजी घेवून ज्यादिवशी शासकीय रुग्णालयात डोस दिले जाते त्यादिवशी खास करून बाळाला शासकीय रुग्णालयात घेवून जावून डोस देतात. तब्बल सहा महिन्यांपूर्वी माजलगाव ग्रामीण रुग्णालयात बाळाला डोस द्यायला घेवून गेल्यानंतर उपस्थित परिचारिकांनी बाळाच्या मांडीत डोस दिले. डोस दिल्यानंतर बाळ घरी गेल्यावर रडत होते. नेमका त्याला काय त्रास आहे? हे पालकांना समजून येत नव्हते. बाळ सारखे मांडीला हात लावून आपल्या वेदना सांगण्याचा प्रयत्न करत होता. शेवटी ज्याठिकाणी डोस देण्यात आले त्याठिकाणी एक गाठ निर्माण झाली, ती गाठ नेमकी कशाची आहे? यासाठी पालक वारंवार रुग्णालयात जावू लागते. त्यानंतर ती गाठ कशाची आहे पाहण्यासाठी शेवटी बाळाच्या मांडीचा ▶▶ पान २ वर...

### तब्बल सहा महिन्यानंतर दिड इंच लांब सुई काढण्यात आली

डोस दिल्यानंतर बाळाच्या मांडीला सुरुवातीला एक गाठ आली. ती गाठ डोस दिल्यानंतर आली असल्याचा पालकांना संशय होता. तरीही पालक वारंवार रुग्णालयात जावून ती गाठ कशाची आहे यामुळे चिंतेत होते. शेवटी एक्सरेमध्ये त्या गाठीत सुई असल्याचे दिसून आले. तब्बल सहा महिन्यानंतर सुई असल्याची माहिती मिळाली. शेवटी जिल्हा रुग्णालय प्रशासनाच्या सतर्कतेने बाळाची सुई काढण्यात आली. तब्बल सहा महिन्यानंतर ही शस्त्रक्रिया झाली. पालकांनी जिल्हा रुग्णालय प्रशासनाचे भरभरून आभार मानले. दरम्यान माजलगाव ग्रामीण रुग्णालयातील प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे तब्बल सहा महिने बाळाला त्रास सहन करावा लागला तर पालकांना मानसिक त्रास सहन करावा लागला. यासाठी संबंधितांवर कारवाई करणे अपेक्षित आहे.


# कामाची मर्यादा वाढवून घेण्यासाठी सुशिक्षित बेरोजगार अभियंताकडून जिल्हा परिषद प्रशासनाची फसवणूक

**वर्कडन प्रमाणपत्र, विद्युत अनुज्ञाप्ती प्रमाणपत्र, कामगार प्रमाणपत्र बनावट जोडल्याचा संशय**

**गेवराईच्या किरण नामक एजन्सीने धारूर तालुक्यातील चारदरी येथे काम केल्याचे दाखवून जोडलेले वर्कडन प्रमाणपत्र बोगस**

**धारूर पोलीस ठाणे व पंचायत समितीला तक्रार दाखल, जिल्हा परिषद सीईओ यांनी या गंभीर प्रकरणाकडे लक्ष देण्याची गरज**

**विद्युत अनुज्ञाप्ती प्रमाणपत्राचा रेट एक लाख रुपयांपर्यंत तर वर्कडन प्रमाणपत्रावर सरपंच आणि ग्रामसेवकांची बोगस स्वाक्षरी**




पहिल्या छायाचित्रातील स्वाक्षरीत वर्कडन प्रमाणपत्रावरील असून ही स्वाक्षरी चारदरीच्या सरपंच आणि ग्रामसेवकाची नसल्याचे त्यांनी सांगितले. तसेच त्यांची ओरिजनल स्वाक्षरी दुसऱ्या छायाचित्रात दिसत आहे.

बीड । दिव्य रिपोर्टर

सुशिक्षित बेरोजगार अभियंता डिप्लोमा झाल्यानंतर नियमाने त्यांना ज्या कार्यालयात रजिस्ट्रेशन करायचे त्या कार्यालयात सुशिक्षित बेरोजगार अभियंता नियमाने रजिस्ट्रेशन करतात. रजिस्ट्रेशन केल्यानंतर सुरुवातीला त्या सुबेअला साडेसात लाख रुपयांचे कामे करण्याची मर्यादा असते. त्यानंतर पुढे त्यांनी किती कामे केली त्याचा आढावा घेवून वर्कडन प्रमाणपत्राच्या आधारावर त्यांच्या कामाची ▶▶ पान २ वर...

### काही एजन्सी जीएसटीच्या कचाट्यात

काही सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांनी कामे केल्यानंतर या कामांची बिले जिल्हा परिषद प्रशासनाकडे सादर केलेली आहेत. काही सुबेअ यांनी जीएसटी बुडविण्याचा प्रयत्न करून बनावट बिले सादर करून निधी हडपल्याचीही चर्चा जोरात असून काही एजन्सी या जीएसटीच्या कचाट्यात अडकणार असल्याचेही दिसून येत आहे. यापुढे जिल्हा परिषद प्रशासनाने सुबेअ यांनी सादर केलेल्या बिलांची जीएसटी विभागाकडून पडताळणी करून घेतली तर लाखो रुपयांचा टॅक्स बुडविल्याचे निदर्शणास येईल.

# गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या आदेशाला केंद्रप्रमुख व शिक्षणविस्तार अधिकारी यांच्याकडून केराची टोपली

**बालेपीर परिसरात सर्रास सुरू असलेली भागशाळा केंद्रप्रमुख लक्ष्मीकांत अवढाळ यांच्या निदर्शणास का आली नाही?**

**शिक्षणविस्तार अधिकारी यांनीही का दुर्लक्ष केले? उच्चस्तरीय चौकशीची गरज**

**शिक्षणसंस्थांच्या भागशाळा सुरू ठेवून जिल्हा परिषदच्या शाळा बंद करण्याचा शिक्षणविभागाचा डाव**

**शिक्षण उपसंचालक यांनी या भागशाळेच्या चौकशीसाठी विशेष पथक स्थापन करण्याची गरज**

बीड । दिव्य रिपोर्टर

बीड शहरात काही शिक्षणसंस्थांच्या अनाधिकृत भागशाळा सर्रास सुरू आहेत. याप्रकरणी दिव्य आधारने पाठपुरावा केल्यानंतर उपसंचालक यांनी व्हिडिओ कॉन्फरन्स घेवून अनाधिकृत भागशाळांचा अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या. तसेच माध्यमिक शिक्षणाधिकारी पाटील मॅडम यांनीही अनाधिकृत भागशाळाकडे लक्ष केंद्रित करून सर्व गटशिक्षणाधिकारी यांना सूचना देवून भागशाळा संदर्भात कारवाई करण्याचे आदेशित केले होते. त्या अनुषंगाने गटशिक्षणाधिकारी समंदर खान यांनी २५ जुलै रोजी पत्र काढून सर्व केंद्रप्रमुख व शिक्षणविस्तार अधिकारी यांना सूचना दिल्या होत्या की, अनाधिकृत भागशाळांचा अहवाल सादर करावा परंतु गटशिक्षणाधिकारी यांच्या आदेशाला केंद्रप्रमुख व शिक्षणविस्तार ▶▶ पान २ वर...

### केंद्रप्रमुख लक्ष्मीकांत अवढाळ यांच्या बीटमध्ये भागशाळा सुरू

बीड शहरात तीन केंद्राअंतर्गत शाळा चालविल्या जातात. त्यात अजीजपुरा केंद्र, अशोकनगर केंद्र व धोंडीपुरा केंद्र अशाप्रकारे केंद्रनिहाय या शाळा सुरू आहेत. बालेपीर परिसर हे केंद्रप्रमुख लक्ष्मीकांत अवढाळ यांच्या बीटअंतर्गत असल्याने त्यांना या प्रकरणी विचारणा केली असता त्यांनी बालेपीर परिसरात भागशाळा सुरू असल्याची कबुली दिली. परंतु ती भागशाळा माझ्या केंद्रांतर्गत असलेल्या शिक्षणसंस्थेची नाही त्यांनी स्पष्ट सांगितले. विशेष म्हणजे जर ती भागशाळा त्यांच्या केंद्राअंतर्गत नाही परंतु त्यांच्या बीटपरिसरात सुरू आहे तर मग त्यांनी ही भागशाळा माझ्या बीटअंतर्गत कशी सुरू आहे? असा अहवाल शिक्षणविभागात सादर का केला नाही? तसेच काही शिक्षणसंस्थांच्या भागशाळा बालेपीरशिवाय पेठबीड, गांधीनगर परिसरातही सुरू आहेत. याकडेही केंद्रप्रमुखाने का दुर्लक्ष केले? याचाही शिक्षणउपसंचालकांनी आढावा घेण्याची गरज आहे.

# आरोग्यसेवकांची बोगस भरती व बोगस सॅलरी प्रकरण उघडकीस येईल म्हणून अधिकारी यांनी प्रभारी चार्ज दिला नसल्याची शंका

**जिल्हा हिवताप कार्यालयात मागील पंधरा दिवसांपासून अधिकारी आजारी असल्याने रजेवर**

**माहिती देण्यासाठी विलंब**

**नियमाने पंधरा दिवस अधिकारी रजेवर असल्यास प्रभारी चार्ज देण्याची गरज परंतु हिवताप कार्यालय गेल्या अनेक दिवसांपासून वाऱ्यावर**

बीड । दिव्य रिपोर्टर

जिल्हा हिवताप कार्यालयात दोनशेपेक्षा जास्त आरोग्यसेवक कार्यरत आहेत. यातील काही आरोग्यसेवक प्राथमिक आरोग्यकेंद्र, जिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय येथे कर्तव्यावर असल्याचे दिसून येते. परंतु यातील काही आरोग्यसेवक प्राथमिक आरोग्य केंद्रावर कार्यरत असतानाही कर्तव्यावर जात नाहीत. तरीही त्यांचा जिल्हा हिवताप कार्यालयातून पगार निघतो, त्याशिवाय आरोग्यसेवकाच्या भरतीतही गोंधळ झाल्याचे दिसून येत असून हंगामी फवारणी अनुभव प्रमाणपत्रात घोळ घालून ही भरती केल्याचा अंदाजा व्यक्त केला जात असून दिव्य आधारने या प्रकरणी पाठपुरावा सुरू केला आहे. यासाठी काही महत्त्वाची माहिती जिल्हा हिवताप कार्यालयातून मागविण्यात आली असून परंतु जिल्हा हिवताप अधिकारी मागील पंधरा दिवसांपासून आजारी असल्याने रजेवर आहेत. नियमाने पंधरा दिवस अधिकारी रजेवर जात असेल तर प्रभारी चार्ज इतरांना देणे आवश्यक आहे परंतु जिल्हा ▶▶ पान २ वर...

### माहिती आल्यानंतर होणार पोलखोल

जिल्हा हिवताप कार्यालयात एकूण किती आरोग्यसेवक कार्यरत आहेत, हे आरोग्यसेवक कुठे कर्तव्य बजावतात. तसेच जिल्हा हिवताप कार्यालयातून किती लोकांना हंगामी फवारणी अनुभव प्रमाणपत्र देण्यात आले, यातील किती लाभार्थ्यांना आरोग्यसेवक पदाचा लाभ मिळाला. त्याशिवाय बीड हिवताप कार्यालयातून हंगामी फवारणी प्रमाणपत्र घेवून इतर जिल्ह्यात किती कर्मचारी आरोग्यसेवक म्हणून नोकरीला लागले. याशिवाय इतर माहिती जिल्हा हिवताप कार्यालयातून मागविण्यात आलेली आहे. परंतु मागील काही दिवसांपासून जिल्हा हिवताप अधिकारी रजेवर असल्याने संबंधित कर्मचारी अधिकारी नसल्याचे सांगून माहिती देत नाहीत. संबंधित अधिकारी यांनी किमान प्रभारी चार्ज दिला तर माहिती वेळेवर मिळेल. माहिती आल्यानंतर बोगस सॅलरी प्रकरण व बोगस भरती प्रकरणाची मोठी पोलखोल होणार अशी शंका व्यक्त केली जात आहे.

# तहसिलदार यांच्या बोगस स्वाक्षरीचे पत्र वापरुन जमिनीची रजिस्ट्री केलेले खरेदीखत रद्द करून संबंधितांवर गुन्हे दाखल करणार का?

**जिल्हाधिकारी यांनी केज निबंधक कार्यालयातून झालेल्या या रजिस्ट्रीकडे लक्ष देण्याची गरज**

**केज रजिस्ट्री कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह, बोगस स्वाक्षरीचा वापर झालेला असताना त्यांनी फिर्याद का दिली नाही?**

**केज तहसीलदार यांनी त्यांच्या बोगस स्वाक्षरीचा वापर करणाऱ्यांविरोधात पोलीस ठाण्यात तक्रार देण्याची गरज**

बीड । दिव्य रिपोर्टर

पाच टक्के चलन भरून तहसीलदाराच्या पत्राच्या आधारावर जमिनीची खरेदी-विक्री करण्यात आली. चलनभरणा पत्रावरील तहसीलदाराची स्वाक्षरी बोगस असल्याचे निदर्शणास आल्यानंतर केज तहसीलदार यांनी या प्रकरणी रजिस्ट्री कार्यालयाला संबंधित खरेदीखत रद्द करण्याचे आदेशित केले. तसेच याप्रकरणी केज तहसीलदार यांनी वरिष्ठांनाही याचा अहवाल सादर केला. जर तहसीलदारांच्या बोगस स्वाक्षरीचा वापर होत असेल तर ही बाब अत्यंत गंभीर असून या बोगस स्वाक्षरी प्रकरणी बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी लक्ष देण्याची गरज वाटत आहे. विशेष म्हणजे चलनभरणा पत्रावरील तहसीलदार यांची स्वाक्षरी बोगस आहे तर याप्रकरणी फक्त खरेदीखत रद्द करणे कितपत योग्य आहे. ज्यांनी ही बोगसगिरी केली त्यांच्यावर ▶▶ पान २ वर...

### केज निबंधक कार्यालयातून यापूर्वीही अशी बोगसगिरी झाल्याचा संशय

तुकडेबंदी कायदा असल्याने जमिनीची खरेदी-विक्री करायची असेल तर जमिनीची गुंठेवारी करणे किंवा तहसीलदार यांच्याकडे पाच टक्के रक्कम भरून चलनाभरणा पत्र घेणे तरच जमिनीची खरेदी-विक्री शक्य आहे. ज्याप्रकारे बीड नगरपरिषदेतून गुंठेवारी प्रमाणपत्र मिळविण्यासाठी बोगसगिरी झालेली आहे तशीच बोगसगिरी गुंठेवारीसाठी किंवा चलन भरणा पत्रासाठी केज नगरपंचायत व केज तहसील कार्यालयातून बोगसगिरी झालेली आहे का? याचा दिव्य आधार पाठपुरावा करणार असून केज निबंधक कार्यालयातून मोठ्या प्रमाणात गोंधळ झाल्याची शंका व्यक्त केली जात आहे.

### केज निबंधक कार्यालयातून रजिस्ट्री होत नसल्याने बीड कार्यालय गाठले

पूर्वी ज्या त्या तालुक्याच्या रजिस्ट्री संबंधित तालुक्यात होत होत्या परंतु नवीन कायद्यानुसार जिल्ह्यात कुठेही इतर तालुक्यातील जमिनीच्या रजिस्ट्री होण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. याचाच फायदा घेत काही भूमाफिया बीडच्या जमिनीची रजिस्ट्री अंबाजोगाई तर केजच्या जमिनीची रजिस्ट्री बीड रजिस्ट्री कार्यालयातून करत असल्याचे दिसून येत असून दिव्य आधार या प्रकरणी लवकरच मोठी पोलखोल करणार आहे.




# कौटुंबिक न्यायालय परिसरातील लिफ्टच्या कामाकडे शाखा अभियंता यांचे अर्थपूर्ण दुर्लक्ष

## शाखा अभियंता भागवत विश्रामगृहाच्या व्हीआयपी सुटमध्ये बसून हाकतो सार्वजनिक बांधकाम विभागाचा कारभार

बीड । दिव्य रिपोर्टर

लिफ्टच्या कामात हलगर्जीपणा नको या दृष्टीकोनातून दिव्य आधार लिफ्टच्या कामाकडे विशेष लक्ष देवून आहे. शहरातील कौटुंबिक न्यायालय इमारतीला लिफ्ट बसविण्याचे काम प्रगतीपथावर आहे. परंतु संबंधित गुत्तेदाराने लिफ्टच्या कामाचे फाउंडेशन तयार करत असताना कचचा वापर केला. नियमाने कच धुवून वापर करणे बंधनकारक होते. परंतु गुत्तेदाराने कच न धुता बुकट्यासहीत कचचा वापर करत असताना दिव्य आधारने याचे चित्रीकरण केले व ते व्हिडिओ कार्यकारी अभियंता, उपविभागीय अभियंता व शाखा अभियंता

### शाखा अभियंता साईटवर जावून कामाची पाहणी करत नसल्याने कामे निकृष्ट दर्जाची होत असल्याचा संशय

### अंदाजपत्रक व वर्कऑर्डरची प्रत मिळाल्यानंतर दिव्य आधार करणार लिफ्टच्या बोगस कामाची पोलखोल

यांच्या व्हॉटस्ॲपवरून पाठवून त्यांना लिफ्टच्या कामात हलगर्जीपणा होत असल्याचे निदर्शनास आणून दिले. परंतु शाखा अभियंता यांनी याकडे दुर्लक्ष केल्याने शाखा अभियंता हे या कामाकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे.

हमखास शाखा अभियंता विश्रामगृहाच्या परिसरात फिरताना किंवा व्हीआयपी सुटमध्ये बसून टीव्ही पाहताना दिसून येतात. बीड शहरात शाखा अभियंता भागवत यांचे अनेक कामे सुरू आहेत. त्यांनी दिवसभर एक-एक साईटवर जावून पंधरा-पंधरा मिनिटाची वेळही दिली किंवा होत असलेल्या कामाकडे विशेष लक्ष दिले तर नक्कीच कामाचा दर्जा उंचावेल. परंतु शाखा अभियंता विश्रामगृहाच्या व्हीआयपी सुटमध्ये बसून सार्वजनिक बांधकाम विभागाचा कारभार हाकत असल्याचे दिसून येत आहे. वारंवार दिव्य आधारने लिफ्टच्या कामात हलगर्जीपणा होत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आणून दिले असतानाही त्यांनी या कामाकडे का दुर्लक्ष केले? हे मात्र समजून येत नाही. या प्रकरणी दिव्य आधारने पाठपुरावा केल्यानंतर या कामाचे स्टेन्थटेस्ट करण्यात आले असून या टेस्टचा अद्याप अहवाल आला नसल्याची माहिती मिळाली आहे. अंदाजपत्रक आणि वर्कऑर्डरची प्रत मिळाल्यानंतर दिव्य आधार या लिफ्टच्या कामाची मोठी बोगसगिरी उघडकीस आणणार हे मात्र खरे आहे.

### अजितदादा येणार म्हणून टीव्ही सुरु आहे की नाही पाहतो

मा.उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री बीडला येणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर अनेक विभागात हलचल सुरू होते. त्याच दरम्यान भागवत नावाचे अभियंता विश्रामगृहाच्या सुटमध्ये बसून



तारक मेहता का उलटा चष्मा हे सिरियल टीव्हीवर पाहात असताना दिसून आले. त्यांना आपण साईटवर गेले नाहीत का? अशी विचारणा केली असता त्यांनी अजितदादा येणार म्हणून टीव्ही चालू आहे की नाही याची पाहणी करत असल्याचे सांगितले. भागवत हे सिव्हीलचे अभियंता आहेत त्यांनी फक्त सिव्हीलचे कामे पाहावीत, सार्वजनिक बांधकाम विभागात विद्युत कामे पाहण्यासाठी विद्युत अभियंताही आहेत, टीव्ही किंवा इतर इलेक्ट्रीक कामे पाहण्यासाठी विद्युत अभियंता यांची जबाबदारी असून वेळ काढून घेण्यासाठी अजितदादांचे नाव पुढे करून भागवत यांनी साईडवर सुरू असलेल्या कामाकडे दुर्लक्ष करू नये.

## पान १ वरून

### बीडमध्ये बोगस बिले देणारे

हे बिले देत आहेत. औरंगाबाद येथील एजंट ही बिले गुजरातमधून खरेदी करत असल्याची शंका निर्माण झाली असून टॅक्सविभागाने या गंभीर प्रश्नाकडे लक्ष देण्याची गरज आहे. जर या प्रकरणाचा टॅक्स विभागाने कसून पाठपुरावा केला तर कोट्यवधी रुपयांचा जीएसटी घोटाळा उघडकीस येण्याची शक्यता व्यक्त केली जात असून या बोगस बिलाच्या माध्यमातून काही एजंट दररोज लाखो रुपयांची कमाई करत असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे बीड-औरंगाबाद-गुजरात अशी लिंक असून बोगस जीएसटी बिलाचे परराज्यापर्यंत कनेक्शन जुळत आहेत. तसेच मनसेचे राज्यउपाध्यक्ष यांनी मागील काही दिवसांपूर्वी सोळा एजन्सी, ट्रेडर्सची तक्रार केली होती. परंतु या प्रकरणी टॅक्स विभागाने का दुर्लक्ष केले हे मात्र समजून येत नाही.

**या बनावट फर्ममधून फक्त बिलाची उलाढाल**

औरंगाबाद येथील एजन्सी गुजरातच्या एजन्सीकडून बिले टक्केवारी देवून खरेदी करतात. ती बिले बीडच नव्हे तर मराठवाड्यातील इतर जिल्ह्यातही एजंटच्या माध्यमातून विक्री केली जातात. त्या एजंटांना यातून टक्केवारी दिली जाते. या बोगस बिलाची दररोज कोट्यवधीची उलाढाल होत असून एजंट व बनावट फर्मवाले यातून लाखो रुपायंची कमाई दररोज करत असल्याचे दिसून येते. या बनावट फर्ममधून मोठ्या प्रमाणात सिमेंट व स्टील खरेदी झाल्याचे बिले देण्यात येत असल्याची माहिती मिळाली असून हे बनावट फर्म कोणत्याच प्रकारचे सिमेंट व स्टील खरेदी करत नाहीत.फक्त बोगस बिले देण्यासाठी अनोळखी व्यक्तीच्या नावाने फर्म तयार करून हे षडयंत्र सुरू असल्याचे स्पष्ट दिसून येते. एवढ्या मोठ्या प्रमाणात ही बोगसगिरी सुरू असताना टॅक्स विभागाच्या निदर्शणास ही बाब का येत नाही.

### गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या आदेशाला

अधिकारी यांनी केराची टोपली दाखवून अद्यापपर्यंत अनाधिकृत भागशाळांचा अहवाल सादर केला नसून विशेष म्हणजे एका शिक्षणसंस्थेची भागशाळा बालेपीर परिसरात सर्रास सुरू आहे. बालेपीर परिसरातील केंद्रप्रमुख यांच्या बीटमध्ये ही शाळा सुरू असून संबंधित केंद्रप्रमुख लक्ष्मीकांत अवढाळ यांना ही अनाधिकृत भागशाळा का दिसून आली नाही? तसेच शिक्षणविस्तार अधिकारी यांनी या भागशाळेकडे का दुर्लक्ष केले? या सर्व बाबींची उच्चस्तरीय चौकशी करण्याची गरज असून आता शिक्षण उपसंचालक यांनीच या भागशाळेच्या चौकशीसाठी विशेष पथक स्थापन करण्याची गरज भासत आहे.

शिक्षण उपसंचालक यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे अनाधिकृत भागशाळेसंदर्भात अहवाल देण्याच्या सूचना दिल्यानंतरही जर शिक्षणविभाग दुर्लक्ष करत असेल तर ही अत्यंत गंभीर बाब आहे. तसेच गटशिक्षणाधिकारी यांनी यासंदर्भात पत्रव्यवहार करून केंद्रप्रमुख व शिक्षणविस्तार अधिकारी यांना अनाधिकृत भागशाळासंदर्भात अहवाल मागितला असतानाही त्यांनी अहवाल न देणे म्हणजे सर्व काही मिलीभगत असल्यासारखे दिसून येत आहे. जर शिक्षणउपसंचालकांचा आदेश असतानाही कोणतीच कारवाई होत नसेल तर यापुढे दाद कुणाकडे मागावी? असाही प्रश्न उपस्थित झाला आहे. एकीकडे जिल्हा परिषदच्या शाळांची भयान अवस्था होत असताना अशाप्रकारे शिक्षणसंस्थांच्या भागशाळांकडे शिक्षणविभाग दुर्लक्ष करत असेल तर जिल्हा परिषदच्या शाळा बंद करण्याचा हा शिक्षणविभागाचाच डाव आहे की काय? असाही प्रश्न यातून उपस्थित होत असून भागशाळांना पाठिशी घालणाऱ्यांची उच्चस्तरीय चौकशी करून या भागशाळांना कुलूप लावण्यात यावे अशी सर्वसामान्यातून मागणी होत आहे. तसेच वारंवार पाठपुरावा करूनही जर भागशाळा सर्रास सुरू असतील तर कुठेतरी शिक्षणविभाग या शिक्षणसंस्थांसोबत मॅनेज असल्याचीही शंका व्यक्त केली जात असून याप्रकरणी लवकरच काही समाजसेवक आंदोलन उभे करणार आहेत.

**शिक्षणाधिकारी यांनी या भागशाळांचा आढावा घेण्याची गरज**

पूर्वीच्या काळात शाळेची कमतरता होती. म्हणून काही शिक्षणसंस्थांना पूर्वीचे तत्कालीन शिक्षणाधिकारी यांनी ज्या परिसरात शाळा नाहीत त्या परिसरात भागशाळा सुरू करण्यासंदर्भात तात्पुरती परवानगी दिली होती. काही शिक्षणसंस्थांनी त्या परवानगीचा फायदा घेत भागशाळा सुरू केल्या होत्या. नियमाने ती परवानगी तात्पुरती होती. तरीही त्या पत्राचा आधार घेवून काही शिक्षणसंस्था आपली मनमानी करत असल्याचे दिसून येते. २०१० साली तत्कालीन शिक्षणाधिकारी यांनी बालेपीर, पेठबीड व गांधीनगर परिसरातील भागशाळांना भेटी देवून या भागशाळा अनाधिकृत असल्याचा अहवाल दिला होता. जर या अनाधिकृत भागशाळा बंद नाही झाल्या तर त्या भागशाळेत कर्तव्यावर असलेल्या शिक्षकांचा पगार थांबविला जाईल असाही अहवाल तत्कालीन शिक्षणाधिकारी यांनी दिला होता. तरीही त्या भागशाळा आजही सर्रास सुरू असल्याचे दिसून येत असून शिक्षणाधिकारी मात्र या गंभीर प्रश्नाकडे का दुर्लक्ष करत आहे हे मात्र समजून येत नाही. शिक्षणाधिकारी फुलारी यांनी स्वत: फिल्डवर फिरून या भागशाळांचा आढावा घेण्याची गरज आहे.

### कामाची मर्यादा वाढवून घेण्यासाठी

मर्यादा वाढविण्यात येते. कामाची मर्यादा वाढवून घेण्यासाठी काही सुशिक्षित बेरोजगार अभियंतांनी चक्क जिल्हा परिषद प्रशासनाची फसवणूक करून बोगस वर्कडन प्रमाणपत्र जोडून कामाची मर्यादा वाढवून घेतल्याचा प्रकार उघडकीस आला असून धारूर तालुक्यातील चारदरी येथील सरपंच व ग्रामसेवकांनी याप्रकरणी तक्रार देवून संबंधितावर गुन्हे दाखल करण्यासंदर्भात प्रशासनाकडे पत्रव्यवहार केला आहे. फक्त वर्कडन प्रमाणपत्रच नव्हे तर काही सुबेअने प्रमाणपत्र बनावट जोडून आपल्या कामाची मर्यादा वाढवून घेतली असल्याचे दिसून येत असून जिल्हा परिषद प्रशासनाने अशा सुबेअच्या कागदपत्रांची संचिका तपासण्याची गरज आहे.

साडेसात लाखापेक्षा जास्तीची कामे करायची असेल तर मागे केलेल्या कामाचा आढावा म्हणजे वर्कडन प्रमाणपत्र जिल्हा परिषद किंवा इतर रजिस्ट्रेशन केलेल्या विभागात जमा करणे सुबेअला बंधनकारक आहे. कामाची मर्यादा वाढवून घेण्यासाठी गेवराई येथील एका किरण नामक एजन्सीने दाखल केलेल्या वर्कडन प्रमाणपत्र हे धारूर तालुक्यातील चारदरी येथे काम केल्याचे असून तब्बल आठ कामे चारदरी परिसरात केल्याचे त्या वर्कडन प्रमाणपत्रावरून दिसून येते. परंतु या प्रकरणी चारदरीचे सरपंच यांच्याशी विचारणा केली असता वर्कडन प्रमाणपत्रावरील सरपंच आणि ग्रामसेवकाची स्वाक्षरी सरपंचाच्या मोबाईलवरून त्यांना पाठविली असता त्यांनी ही स्वाक्षरी आमची नाही असे म्हणून त्यांनी आपली ओरिजनल स्वाक्षरी पाठवून याप्रकरणी आम्ही मागेच तक्रार दिली असल्याचे सांगून तक्रार दिल्याचे अर्जही दिव्य आधारच्या प्रतिनिधीला पाठविले. एकंदरीत काही सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांनी कामाची मर्यादा वाढवून घेण्यासाठी वर्कडन प्रमाणपत्र बोगस जोडल्याचे यातून स्पष्ट होत असून या गंभीर प्रकरणाकडे सीईओ जितिन रहेमान यांनी लक्ष देण्याची गरज आहे.

**विद्युत अनुज्ञप्ती प्रमाणपत्राचा रेट एक लाख तर इतर काही प्रमाणपत्रही बनावट असल्याचा संशय**

विद्युतची कामे करायची असेल तर सुबेअला विद्युत अनुज्ञप्ती प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे. म्हणून काही सुबेअ विद्युत अनुज्ञप्ती प्रमाणपत्र जोडून विद्युत कामांचे कंत्राट घेतात. परंतु मिळालेल्या माहितीनुसार विद्युत अनुज्ञप्ती प्रमाणपत्र मिळविण्यासाठी तब्बल एक लाख रुपये सुबेअला मोजावे लागतात अशी जोरदार चर्चा असून एक लाख रुपये घेवून अनुज्ञप्ती प्रमाणपत्र देणारा कोण? याची शोध घेण्याची गरज आहे. तसेच कामाची मर्यादा वाढवून घेण्यासाठी संबंधित गुत्तेदाराचे डिप्लोमा होल्डर व असिस्टंट असे कर्मचारी कामावर आहेत म्हणून कामावर असलेल्या कामगार प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक आहे. कदाचित हे प्रमाणपत्रही बनावट जोडले असल्याची शंका असून दिव्य आधारच्या प्रतिनिधीकडे बनावट कागदपत्रे जोडून कामाची मर्यादा वाढवून घेतलेल्या काही एजन्सीची नावे उपलब्ध आहेत. यासाठी दिव्य आधार यापुढेही या बोगसगिरीचा पाठपुरावा करणार आहे.

## पान १ वरून

### बाळाच्या मांडीत डोस

एक्सरे घेतला, एक्सरेमध्ये बाळाच्या मांडीत सुई असल्याचे दिसून आले. त्यानंतर पालकांनी थेट जिल्हा रुग्णालय गाठले. जिल्हा रुग्णालयातील डॉक्टरांनी बाळावर योग्य उपचार करून दि.१७ ऑगस्ट रविवारी बाळाच्या मांडीची शस्त्रक्रिया करून दिड इंच लांब अशी सुई त्या गाठीतून काढली. पालकांनी जिल्हा रुग्णालय प्रशासनाचे आभार मानले असले तरी यातून माजलगाव ग्रामीण रुग्णालयाचा हलगर्जीपणा उघडकीस आला. जिल्हा शल्यचिकित्सक यांनी संबंधितांवर कारवाई करण्याची गरज आहे.

कुंभारपिंपळगाव ता.घनसांगवी जि.जालना येथील जुबेर कुरेशी यांची पत्नी गर्भवती असल्याने प्रसूतीसाठी माजलगाव येथे माहेरी गेली होती. प्रसूतीदरम्यान तिने गोंडस बाळाला जन्म दिला. त्यानंतर बाळाला तिसरा डोस देण्यासाठी माजलगाव ग्रामीण रुग्णालयात गेले असता तेथे नऊ महिन्याच्या जियानला डोस देण्यात आले. डोस दिल्यानंतर बाळाच्या मांडीला सारखा त्रास होत होता. वारंवार रुग्णालयात जावूनही बाळाला योग्य उपचार मिळाले नाही. शेवटी पालकांनी खासगी रुग्णालयात बाळाच्या मांडीचे एक्सरे काढल्यानंतर मांडीत डोस दिल्यानंतरची सुई तुटून मांडीत राहिली असल्याचे समजून आले. त्यानंतर बाळाच्या मांडीचे त्याठिकाणी गाठ निर्माण झाली, १३ ऑगस्ट रोजी बाळाला उपचाराकामी बीड जिल्हा रुग्णालयात दाखल केल्यानंतर रुग्णालय प्रशासनाने बाळाच्या मांडीचे पुन्हा एक्सरे काढले. एक्सरेमध्ये बाळाच्या मांडीत सुई असल्याचे स्पष्ट दिसून आले. त्यानंतर जिल्हा रुग्णालय प्रशासनाने रविवारी त्या बाळाच्या मांडीवर यशस्वी शस्त्रक्रिया करून डोस देताना तुटून राहिलेली सुई काढली. सध्या बाळाची प्रकृती स्थिर असून जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहे.

### आरोग्यसेवकांची बोगस भरती

हिवताप कार्यालय वाऱ्यावर असून अद्यापपर्यंत कोणालाही प्रभारी चार्ज देण्यात आलेला नाही. प्रभारी चार्ज न देण्यामागचे रहस्य काय? याचीही चौकशी करणे गरजेचे आहे.

आरोग्यसेवकांची बोगस भरती व आरोग्यसेवकांची बोगस सॅलरी प्रकरण उघडकीस येईल म्हणून संबंधित अधिकारी यांनी प्रभारी चार्ज दिला नसल्याची चर्चा असून नियमाने जर अधिकारी तीन दिवस रजेवर जात असेल तर प्रभारी चार्ज देणे गरजेचे आहे. परंतु मागील पंधरा दिवसांपासून जिल्हा हिवताप अधिकारी हे वैद्यकीय रजेवर आहेत तर मग त्यांनी प्रभारी चार्ज का दिला नाही? असाही प्रश्न उपस्थित होत असून या मागचे कारण काय? याचा प्रशासनाने शोध घेण्याची गरज आहे. जिल्हा हिवताप कार्यालयातील काही आरोग्यसेवकांना प्राथमिक आरोग्य केंद्रावर कर्तव्य करण्याचे आदेशित आहे परंतु काही आरोग्यसेवक प्राथमिक आरोग्य केंद्रावर अनुपस्थित राहून जिल्हा हिवताप कार्यालयातून पूर्ण पगार घेतात. चौसाळ्याचे वैद्यकीय अधिकारी यांच्या मस्टर अहवालावरून ही बाब समोर आली असून जर चौसाळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रावर संबंधित आरोग्यसेवक गैरहजर होते तर त्यांना पगार कसा मिळाला? जर हिवताप कार्यालयाने पगार दिला नसेल तर ही बाब वेगळी आहे. परंतु संबंधित आरोग्यसेवक मागील अनेक महिन्यांपासून कर्तव्यावर नव्हते. तरीही त्यांना पगार मिळाला असल्याची बाब समोर आली असून एकटा चौसाळा आरोग्य केंद्रातील हा प्रकार नसून इतर ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्रातही असाच प्रकार सुरू असल्याचे दिसून येत आहे. तसेच आरोग्यसेवक भरतीतही अनियमितता झाली असून यातील मुख्य सुत्रधार कोण? याचाही लवकरच छडा लागणार आहे.

### तहसिलदार यांच्या बोगस

नियमाने गुन्हा दाखल होणे अपेक्षित असतानाही केज निबंधक कार्यालयातील अधिकाऱ्यांनी संबंधितांविरोधात केज पोलीस ठाण्यात तक्रार का दिली नाही? तसेच तहसीलदार यांनी या प्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार का दाखल केली नाही? या सर्व प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून अशाप्रकारे बोगसगिरी करणाऱ्यांवर गंभीर कारवाई केली तर पुढे असे प्रकरण घडणार नाही परंतु अधिकारी या प्रकरणाला दडपण्याचा प्रयत्न करत आहेत की काय? असेही दिसून येत आहे.

केज तालुक्यातील दोन जमिनीची केज निबंधक कार्यालयातून रजिस्ट्री झाली. ही रजिस्ट्री करण्यासाठी संबंधितांनी पाच टक्के चलनभरणा पत्र जोडले. परंतु त्या चलनभरणा पत्रावरील तहसीलदार यांची स्वाक्षरी बोगस असल्याचे निदर्शणास आल्यानंतर रजिस्ट्री कार्यालयातील काही अधिकाऱ्यांनी ही बाब केज तहसीलदार यांना कळविली. त्या दृष्टीकोनातून केज तहसीलदार यांनी सदरील खरेदीखत रद्द करण्याचे आदेशित केले. या प्रकरणाला दिव्य आधारने पाठपुरावा करून केज तहसीलदार यांच्या बोगस स्वाक्षरीची पोलखोल केली. तसेच बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनाही या बोगस स्वाक्षरी प्रकरणी कळविले. ज्याअर्थी तहसीलदार यांच्या बोगस स्वाक्षरीचा वापर झालेला आहे हे निष्पन्न झाले असून केज निबंधक कार्यालयातील अधिकाऱ्यांनी बोगसगिरी करणाऱ्यांविरोधात नियमाने तक्रार देवून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याची गरज आहे. किंवा केज तहसीलदार यांनी या प्रकरणी फिर्याद देवून बोगसगिरी करणाऱ्यांवर कारवाईसंदर्भात पाठपुरावा करणयची गरज आहे. परंतु या प्रकरणी अधिकारी का गप्प आहेत हे मात्र समजून येत नाही. तहसीलदार यांच्या बोगस स्वाक्षरीचा वापर करून खरेदीखत करण्यात आले. ते खरेदीखत रद्द करणे योग्यच आहे परंतु संबंधितांवर कारवाईही करणे गरजेचे असून जर अशा बोगसगिरीला लगाम लावायचा असेल तर अधिकाऱ्यांनी गंभीर पावले उचलणे अपेक्षीत आहे.







१५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी औरंगाबाद येथील महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाच्या मुख्यालयात बोर्डाचे अध्यक्ष मा.ना. समीर काझी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले यावेळी राज्यभरातील अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते,समाजसेवक,नागरिक आणि विविध शाळेतील बक्षीस पात्र विद्यार्थी,शिक्षक उपस्थित होते ध्वजारोहण नंतर समीर काजी यांचे भाषणही झाले

# समाजहित घडविणाऱ्या संस्थेचे कार्य सुरू राहावे : चंद्रशेखर उपरकर

## कणकवली येथे जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार वितरण

कणकवली। दिव्य रिपोर्टर

समाजकार्य कधीही कमी होत नाही आणि जनजागृती सेवा संस्था तर पाच जिल्ह्यात विविध माध्यमातून सामाजिक कार्य अविरतपणे करत आहे. त्यात्या भागातील समस्या जाणून घेऊन तसे कार्य करणारी संस्था महत्वाची ठरते. असे समाजहित घडविणाऱ्या या संस्थेचे कार्य असेच सुरू राहावे, असे प्रतिपादन सेवानिवृत्त अधिकारी चंद्रशेखर उपरकर यांनी केले.

ते कणकवली येथील जनजागृती सेवा संस्थेच्या राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार वितरण समारंभात बोलत होते. यावेळी व्यासपीठावर अभिनेत्री अक्षता कांबळी, श्री चौंडेश्वरी महिला मंडळाच्या अध्यक्षा राजश्री धुमाळे, वास्को गोवा येथील कवयित्री, समुपदेशक शुभांगी गुरव, सामाजिक कार्यकर्ते राजू मानकर, संस्थेचे संस्थापक



अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने आणि गणेश प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी बोलताना अभिनेत्री अक्षता कांबळी म्हणाल्या की, दुसऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान निर्माण होत असेल तर त्याच्यापेक्षा मोठे समाधान कोणतेच नाही. नेमकेपणाने तेच कार्य या संस्थेच्या माध्यमातून मुंबईपासून सिंधुदुर्ग पर्यंत सातत्याने होत आहे. यावेळी राजश्री धुमाळे, शुभांगी गुरव यांनी मनोगत व्यक्त केले. समाजरत्नांचा गौरव,यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महेश सावंत, निकेत नरहरी पावसकर, सहदेव धरणे, डॉ. संजीव लिंगवत, अक्षय मेस्त्री, सुरेश कदम, दत्ताराम टोपले, राजेंद्र बिड्ये, निलेश गवंडी,दत्तप्रसाद आदिती सामंत, संध्या तेरसे, सागर तळवडेकर, मिहिर मठकर, संतोष टक्के प्राची तावडे, अजय गुरसाळे यांना सन्मानपत्र,संस्थेचा अहवाल,आरती संग्रह, भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी पुरस्कार प्राप्त मान्यवरांमधून दत्ताराम टोपले, सुरेश कदम, माहिर मठकर, संतोष टक्के, अजय गुरसाळे यांनी मनोगत व्यक्त केले. या संपूर्ण कार्यक्रमाचे प्रास्ताविक गुरुनाथ तिरपणकर यांनी केले.सूत्रसंचालन भरत तोरसकर यांनी करून श्रुती उरुणकर यांनी आभार मानले. हा संपूर्ण कार्यक्रम यशस्वी पार पडण्यासाठी गंधाली तिरपणकर, श्रुती उरुणकर, दत्ता कडुलकर यांनी विशेष मेहनत घेतली. कार्यक्रमाचा शेवट सहदेव धरणे यांनी घातलेल्या मालवणी गाऱ्हाण्याने झाली.

# वारसा जपणारे: भारतीय मुसलमान कला, भाषा आणि स्थापत्याचे संवर्धक

एका अशा देशात, जिथे लोक अनेक भाषा बोलतात, वेगवेगळ्या धर्मांचे पालन करतात आणि विविध संस्कृतींशी संबंधित आहेत, तिथे सामायिक वारसा जपणे ही निष्ठेची खूण आहे. भारतीय मुसलमान या महान सांस्कृतिक नकाशयात एक अनोखी ओळख जपतात. ते केवळ हिंद-इस्लामी वारशाचे वारसदार नाहीत, तर भावी पिढ्यांसाठी त्याचे रक्षकदेखील आहेत. जसजशी जग अधिक विभागली जाते आहे आणि संस्कृती एकसारख्या होत आहेत, तसतसे भारतीय मुसलमान शांततेने गंगा-जमनी संस्कृतीचा वारसा टिकवून ठेवत आहेत. कला, भाषा आणि स्थापत्य यामधील त्यांचे योगदान फक्त इतिहासापुरते मर्यादित नाही, तर आजही हे क्षेत्र त्यांनी जिवंत आणि क्रियाशील ठेवले आहे-जिथे परंपरा एकत्र येतात आणि सौंदर्याचा संगम घडतो.

भारतीय इस्लाम स्थानिक रितीरिवाज, सौंदर्यविवेक आणि तात्त्विक संवाद यांच्या परस्पर संपर्कातून विकसित झाला. याचा परिणाम एका ढोबळ धार्मिक-सांस्कृतिक चौकटीत झाला नाही, तर एक अनोखा भारतीय संगम तयार झाला-जो सूफी दरगाह, मुगल कलाकृती, उर्दू काव्य आणि हिंद-इस्लामी स्थापत्यशैलीमध्ये दिसून येतो. या कलाकृती केवळ इस्लामी उद्देश दाखवणाऱ्या नव्हत्या, तर त्या हे दाखवतात की वेगवेगळ्या संस्कृती एकमेकांवर कसा प्रभाव टाकू शकतात. मुस्लिम कारागिरांचे हात त्यांच्या सभोवतालच्या भूमीशी एकरूप होते-मग ते ताजमहालची घुमट असो की लखनौच्या चिकनकारीतील नजाकत.

आज, जेव्हा ललितकला आणि सांस्कृतिक विविधतेला कमी पाठिंबा मिळतो आहे, तेव्हा या वारशाचे रक्षण करणे ही जबाबदारी व्यक्ती आणि समुदायांवर आली आहे. भारतीय मुसलमान या वारशाचे बळकट रक्षक म्हणून पुढे आले आहेत. उर्दू केवळ एक भाषा नाही, तर ती एक सांस्कृतिक खजिना आहे जो विविध धर्मीय लोकांच्या संवादातून उगम पावलेला आहे. तिने फारसी आणि संस्कृत दोन्हींपासून कल्पना घेतल्या, आणि यात सूफी संतांच्या व भक्ति कवींच्या विचारांची झलक दिसते. गालिबचे शेर, रहीमचे दोहे, आणि कबीरचे पदे यामध्ये अनेकदा एकसारखे शब्द आणि विचार असतात. मात्र आज, जेव्हा उर्दूला शिक्षणव्यवस्थेत दूर लोटले जात आहे, तेव्हा भारतीय मुसलमान लेखक, कवी, पत्रकार आणि डिजिटल संग्रहकर्ते तिच्या सौंदर्याला टिकवून ठेवत आहेत. रेख्ता सारख्या वेबसाईट्स या भाषिक वारशाचे जतन करणारे महत्त्वाचे केंद्र बनले आहेत, जेणेकरून हा वारसा नवीन पिढ्यांपर्यंत पोचत राहील.

ही जपणूक पारंपरिक हस्तकला जिवंत ठेवण्याच्या स्वरूपातही दिसून येते. हैदराबादमध्ये मुस्लिम कुटुंबे आजही बिड्रीवेअर (चांदीच्या नक्षीकामासहित धातुशिल्प) कलेचे जतन करत आहेत, जी दख्खनच्या सत्तांच्या काळापासून चालू आहे. लखनौमध्ये झरदोजीचे कारागीर मुगल काळातील कशीदाकारी जिवंत ठेवत आहेत. काश्मीरमध्ये, नामदारग (गालिचा बनविणे) आणि पेपियर माशे (कागदी हस्तकला) करणारे मुस्लिम कलाकार कोणतीही संस्थात्मक मदत न घेता ही मरणपंथाला लागलेली कला जपून ठेवत आहेत. या केवळ कारागिरी नाहीत, तर त्या ऐतिहासिक स्मृती, कलात्मक कौशल्य आणि सौंदर्य यांचे प्रतीक आहेत, ज्या हिंदू-मुस्लिम कलाशैलींच्या संगमातून जन्मल्या.

इतर सर्व कलेपेक्षा, स्थापत्यकला भारतीय मुस्लिम संस्कृतीच्या समरस आत्म्याचे सर्वोत्तम प्रतिबिंब देते. भारतीय इस्लामी स्थापत्यशैली कालक्रमाने विकसित होत गेली, ज्यामध्ये स्थानिक शैली फारसी आणि मध्य आशियाई नमुन्यांशी समरस करण्यात आली. याचे उत्तम उदाहरण म्हणजे दिल्लीचे कुतुब कॉम्प्लेक्स, भोपाळचे महाल आणि गुलबर्ग्याच्या मशीदी. धार्मिक तणाव असतानाही, मशीदीच्या बांधकामात हिंदू कारागिर सहभागी होत आणि मुस्लिम आश्रयदाते मंदिरांच्या बांधणीसाठी निधी पुरवत. आजही ही समरसता चालू आहे-जशी की आधुनिक मशीदींच्या रचनेत स्थानिक स्थापत्यशैलींचा वापर केला जातो. उदा., राजस्थानमध्ये लाल दगड, केरळमध्ये लाकूड, तर गुजरातमध्ये संगमरवर वापरून मशीदी उभारल्या जातात.

मात्र, असा वारसा जपणे आता एक राजकीय विषय बनत चालले आहे. २००६ मधील सच्चर समितीने मुस्लिम समाजाच्या शिक्षण आणि रोजगार क्षेत्रातील गंभीर मागासलेपणावर प्रकाश टाकला, आणि त्यानंतर अनेक अभ्यासांनी याला दुजोरा दिला. २०२१ मध्ये प्यू रिसर्च सेंटरच्या अभ्यासानेही मुस्लिम समुदायाच्या सामाजिक प्रगतीत घट दाखवली. या संरचनात्मक अडचणी असूनसुद्धा, भारतीय मुसलमान उपखंडातील समरस सांस्कृतिक वारशाची आत्मा टिकवून ठेवत आहेत. जेव्हा ते हे करतात, तेव्हा ते केवळ कलाकार, भाषाशास्त्रज्ञ किंवा स्थापत्यकार राहत नाहीत, तर ते एक सांस्कृतिक रक्षणकर्ते बनतात.

आजही हिंदू, शीख, ख्रिश्चन आणि मुसलमान समान श्रद्धेने सूफी दरग्यांना भेट देतात, जसे की अजमेर शरीफ आणि दिल्लीतील निजामुद्दीन औलिया यांच्या समाधी. कवाल अजूनही अशी कव्वाली गातात जी कृष्ण आणि अल्लाह दोघांची स्तुती करते. ग्रामीण भारतात मुस्लिम संगीतकार होळीच्या मेळ्यांमध्ये वाद्ये वाजवतात, आणि हिंदू कवी फारसीयुक्त उर्दूमध्ये कविता लिहितात. हा सांस्कृतिक सातत्य त्या विभाजनवादी आवाजांना एक शांत पण ठाम उत्तर आहे, जे भारतीय मुसलमानांना त्यांच्या स्वतःच्या मातीत परके ठरवू पाहतात. वाढत्या असहिष्णुतेच्या काळात, ही समरस संस्कृती जपणे ही एकप्रकारची शांत प्रतिकाराची भूमिका झाली आहे. उर्दू शेर म्हणणे, बिड्रीचा गुलदस्ता तयार करणे, किंवा एखादी जुनी मशिद पुन्हा दुरुस्त करणे-या सगळ्या गोष्टी ही घोषणा करतात की भारतीयत्व कधीच एकसंध नव्हते, तर ते अनेक रंग, अनेक आवाज आणि अनेक संस्कृतींच्या मिलाफातून निर्माण झाले आहे.

हे भूतकाळात अडकून राहणे नाही, तर त्या भूतकाळावर आदर आणि सामूहिक स्मृतीच्या आधारे नव्याने भविष्य घडवण्याचा प्रयत्न आहे.

जर भारताने आपल्या संविधानात दिलेल्या विविधतेतील एकता या वचनास खरेच जपायचे असेल, तर त्याला या वारशाच्या रक्षणकर्त्यांना ओळखून त्यांना संपूर्ण साथ द्यावी लागेल. भारतीय मुसलमान केवळ आपली संस्कृती जपत नाहीत, तर प्रत्यक्षात ते भारताच्या एकूण सभ्यतेचे रक्षण करत आहेत. प्रत्येक चिकनकारीचा नक्षीकाम, प्रत्येक मुशायरामध्ये ऐकवलेली उर्दू गजल, आणि आकाशाकडे ताठ मानेने उभी असलेली प्रत्येक जुनी मीनार-हे सगळे या गोष्टीची साक्ष देतात की भारतीयत्वाचे खरे स्वरूप एका नव्हे, तर अनेक रंग, अनेक सूर आणि अनेक संस्कृतींच्या संगमात आहे.

– अल्ताफ मीर
पीएच.डी. स्कॉलर,
जामिया मिलिया इस्लामिया

# सहा महिन्यांपासून प्रलंबित असलेली चौकशी अवघ्या पंधरा मिनिटात पूर्ण

## नेकनूर ग्रामपंचायतमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराच्या चौकशीसाठी गेलेल्या चौकशी समितीने थातूर-मातूर चौकशी केल्याची शंका

बीड । दिव्य रिपोर्टर

नेकनूर ग्रामपंचायत अधिकारी व इतरांनी पंधरा वित्त आयोगाच्या निधीत घोळ घालून दोन लाख रुपयांचा भ्रष्टाचार केल्याची तक्रार नेकनूर ग्रामपंचायतचे उपसरपंच व इतरांनी बीड पंचायत समिती बीडीओ यांच्याकडे केल्यानंतर तत्कालीन बीडीओ यांनी मार्च महिन्यात या चौकशीसाठी चौकशी समिती स्थापन केली होती. तब्बल दोन महिन्यानंतर ही चौकशी समिती नेकनूर ग्रामपंचायतीत चौकशीसाठी गेल्यानंतर संबंधित ग्रामपंचायत अधिकारी यांनी अर्धवट अभिलेखे सादर करून चौकशीकामी अडथळा निर्माण केला. त्यानंतर ही चौकशी अर्ध्यावरच थांबली होती. याप्रकरणी दिव्य आधारने पाठपुरावा केल्यानंतर पुन्हा ही चौकशी समिती सक्रीय झाली आणि या चौकशी समितीत पुन्हा दोन अधिकारी सामील करण्यात आले. आता ही चौकशी पाच अधिकारी करणार होते. १२ ऑगस्ट रोजी ही चौकशी पुन्हा करण्यासंदर्भात पत्रव्यवहार



करण्यात आला होता. त्या दृष्टीकोनातून १२ ऑगस्ट रोजी ही चौकशी समिती नेकनूर ग्रामपंचायतीत दाखल झाली. सहा महिन्यांपासून प्रलंबित असलेली चौकशी अवघ्या १५ मिनिटातच पूर्ण झाली. विशेष म्हणजे तक्रारीच्या अनुषंगाने या चौकशी समितीने कोणतीच छाननी केल्याचे दिसून येत नाही. ज्याअर्थी तक्रारदाराने दोन लाख रुपयांचा भ्रष्टाचार काम न करता निधी हडप केल्याचा आरोप

### त्या दोन लाख रुपये कामाचे वर्कऑर्डर पाहण्याऐवजी चौकशी समिती मेजरमेंट बुक घेवून परतली

### चौकशी समितीतील दोन सदस्य चौकशीसाठी गैरहजर, चौकशी समितीचीच चौकशी करण्याची गरज

केलेला आहे तर मग ते काम झाले की नाही यासाठी चौकशी समितीने त्या कामाचे वर्कऑर्डर पाहणे अपेक्षित होते. परंतु संबंधित चौकशी समिती फक्त त्या दोन लाख रुपयांच्या कामाचे मेजरमेंट बुक घेवून परतली. विशेष म्हणजे या चौकशीकामी दोन अधिकारी गैरहजरही होते. एकंदरीत या चौकशी समितीने थातूरमातूर चौकशी केल्याचे दिसून येत असल्याने आता या चौकशी समितीचीच चौकशी करणे गरजेचे झाले आहे.

नेकनूर ग्रामपंचायतचे उपसरपंच यांनी ग्रामपंचायत अधिकारी व इतरांवर आरोप करत पंधरा वित्त आयोगाच्या निधीतून कोणतीही कामे न करता दोन लाख रुपयांचा अपहार केला. विशेष म्हणजे हे दोन लाख रुपये ज्या एजन्सीच्या अकाउंटवर टाकण्यात आले त्या एजन्सीनेही नेकनूर ग्रामपंचायतला पत्रव्यवहार करून हे दोन लाख रुपये माझ्या एजन्सीच्या नावावर कोणत्या कामाचे टाकण्यात आले? असा जवाब विचारला. ज्याअर्थी एजन्सीनेच हे दोन लाख रुपये कोणत्या कामाचे आहे? अशी विचारणा केल्यानंतर यातूनच स्पष्ट होते की, कुठेतरी दोन लाख रुपयांचा भ्रष्टाचार झाला असावा. सर्व काही स्पष्ट असताना चौकशी समितीने अवघ्या पंधरा मिनिटात या प्रकरणाची काय चौकशी केली? तसेच मेजरमेंट बुक घेवून ही चौकशी समिती परतली. या मेजरमेंट बुकमधून चौकशी समिती काय सिद्ध करणार? असे अनेक प्रश्न उपस्थित झाले असून चौकशी समितीने जर हे काम झाले असेल तर ज्या एजन्सीने हे काम केले त्या एजन्सीच्या नावाने वर्कऑर्डर निघाले असेल तर मग ते वर्कऑर्डर घेवून काम झालेल्या ठिकाणी चौकशी समितीने त्या कामाची पाहणी का केली नाही? तसेच ज्या एजन्सीने पत्रव्यवहार करून दोन लाख रुपये त्या एजन्सीच्या नावावर कोणत्या कामाचे टाकण्यात आले असा प्रश्न उपस्थित केलेला आहे. चौकशी समितीने त्या अर्जाची का चौकशी केली नाही? अशाप्रकारे एकंदरीत ही चौकशी थातूरमातूर झाली असून या प्रकरणाकडे वरिष्ठांनी लक्ष देणे गरजेचे वाटते.

### सीईओ रहेमान यांनी नेकनूर ग्रामपंचायतचा आढावा घेण्याची गरज

पंधरा वित्त आयोगाच्या निधीत घोळ घालून कागदोपत्री कामे दाखवून दोन लाख रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप ग्रामपंचायत अधिकारी व इतरांवर केलेला आहे. तसेच संबंधित ग्रामपंचायत अधिकारी व इतरांनी एका एजन्सीच्या अकाउंटवर दोन लाख रुपये टाकून ते पैसे परस्पर उचलल्याचाही आरोप असून संबंधित एजन्सीनेही माझ्या अकाउंटवर हे दोन लाख रुपये कोणत्या कामाचे टाकण्यात आल्याची नेकनूर ग्रामपंचायतला विचारणा केलेली आहे. ग्रामपंचायत अधिकारी म्हणतात की, आम्ही ते काम केले तर मग ग्रामपंचायत अधिकारी यांनी ज्या एजन्सीकडून हे काम करून घेतले त्या एजन्सीच्या नावाचे वर्कऑर्डर प्रकाशित करावे. तसेच त्या एजन्सीने दोन लाख रुपये माझ्या एजन्सीच्या नावावर कशाचे टाकण्यात आले? याचाही खुलासा ग्रामपंचायत अधिकारी यांनी करावा. सर्व काही स्पष्ट असताना चौकशी समितीने या बाबींची चौकशी का केली नाही? असा प्रश्न उपस्थित होत असून सीईओ जितीन रहेमान यांनी स्वत: नेकनूर ग्रामपंचायतचा आढावा घेतला तर मोठी बोगसगिरी समोर येण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

# अजित पवारांनी गुंडांची टोळी पोसली- विजयकुमार घाडगे

## शेतकऱ्यांची कर्जमाफी न केल्यास नेत्यांना गावात फिरू देणार नाही बीडमध्ये पत्रकार परिषद : शेतकऱ्यांचा पोरावरील हल्ल्याचा बदला शेतकऱ्यांच्या सर्व मागण्या मान्य करून घेणार –घाडगे

बीड । दिव्य रिपोर्टर

शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवण्याचे सोडून राज्याचे कृषी मंत्री सभागृहात रम्मी खेळत असल्याने आंदोलनाचा भाग म्हणून आम्ही सुनिल तटकरे यांना लातूर मध्ये पत्ते भेट दिले होते. त्यानंतर राष्ट्रवादीच्या गुंडानी माझ्यावर प्राणघातक हल्ला केला. अजित पवार यांनी कृषी मंत्री यांच्याबद्दल निर्णय घेतला मात्र हल्ला करणाऱ्या गुंडांचा सन्मान करून त्यांना पक्षात मोठ स्थान दिलं. शेतकऱ्यांच्या पोराने शासनाला प्रश्न विचारले तर राष्ट्रवादीचे हे गुंड त्यांच्यावर हल्ला करत आहेत. हे अजित पवार गटाला परवडणारे नाही. आम्ही याचा बदला शेतकऱ्यांच्या कापसाला १० हजार रूपये,




सोयाबीनला ८ हजार रूपये हमी भाव घेऊन आणि पिक विमा शेतकऱ्यांच्या पदरात पाडून अशा भ्याड हल्याचा बदला घेणार असल्याचे अखिल भारतीय छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे यांनी केले.

ते बीडमध्ये शासकीय विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी बीड जिल्हाध्यक्षा अशोक रोमन यांच्यासह छावाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना विजयकुमार घाडगे म्हणाले की, राष्ट्रवादीच्या गुंडांनी माझ्यावर हल्ला केल्यानंतर चार दिवसाच्या उपचारांनंतर मी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली. तेव्हा अजित पवार म्हणाले ज्या पदाधिकाऱ्यांनी हल्ला केला त्यांना पुन्हा पक्षात घेणार नाही. माणिकराव कोकाटे यांच्या बद्दल योग्य तो निर्णय घेऊ असे आश्वासन दिले. कृषी मंत्री यांच्या बदद्ल अजित पवार यांनी निर्णय घेतला मात्र, आमच्या जखमा ओल्या असताना आमच्यावर जीवघेणा हल्ला करणाऱ्या गुंडांना पक्षाच्या फादर बॉडीत घेऊन अजित पवार यांनी नविन पायंडा पाडला आहे. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांमध्ये असा समज झाला आहे. की शेतकऱ्यांच्या विरुध्द राष्ट्रवादी अजित पवार गट आहे. शेतकऱ्यांच्या पोराला मारहाण करण्यासाठी अजित पवार यांनी गुंडांची टोळी ठेवली आहे. जशास तसे उत्तर छावा संघटना देत आहे. मात्र आम्ही या सरकारकडून शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवून त्याचा बदला पूर्ण करणार आहोत. निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांचा सात बारा कोरा करण्याचे दिलेले आश्वासन आम्ही पूर्ण करूण घेणार आहोत. जर शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवले नाही तर नेत्यांना गाव बंदी करणार आहोत. असे विजयकुमार घाडगे म्हणाले.

### अशोक रोमन यांच्यावर लवकरच मोठी जबाबदारी

अशोक रोमन यांनी बीड जिल्ह्यातील गोरगरीबांच्या प्रश्नांवर आवाज उठवून ते शासन दरबारी सोडवण्याचा प्रामाणीक प्रयत्न केला आहे. या सोबतच युवकांची मोठी फळी त्यांच्या मागे आहे. लवकरच त्यांच्यावर मोठी जबाबदारी टाकण्यात येणार असल्याची माहिती प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे यांनी दिली.या पत्रकार परिषदेची वेळी विजयकुमार घाडगे यांच्यासोबत अखिल भारतीय छावाचे बीड जिल्हाप्रमुख अशोक अण्णा रोमन, संभाजीनगर जिल्हाप्रमुख अशोक मोरे पाटील, लातूर जिल्हा प्रमुख दीपक नरवडे, जालना जिल्हाप्रमुख संदीप ताडगे, इत्यादी छावा प्रतिनिधी उपस्थित होते पत्रकार परिषद यशस्वी करण्यासाठी अखिल भारतीय छावाचे बीड जिल्हाप्रमुख अशोक अण्णा रोमन यांच्यासह विद्यार्थी आघाडी प्रमुख पप्पू लांडे पाटील, शहर प्रमुख सचिन हरणमारे, पप्पू शिंदे, पप्पू मस्के पाटील, दत्ता काशीद, दत्ता साळुंके, शंकर,श कुरळे, बाळू कदम, विठ्ठल अण्णा काळे, सिद्दिकी फारुकी, वाजेद खान, अविनाश हातागळे, अमोल अंकुटे, सतीश मस्के, गिरीश करवा, यांच्यासह सर्व छावा कार्यकर्त्यांनी मेहनत घेतली.



**बीड : पीएसआय राजाभाऊ गुळभिले यांनी १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी येथील जिव्हाळा शहरी बेघर निवारा केंद्र येथे आगळावेगळा स्वातंत्र्यदिन साजरा करून या बेघरांच्या चेहऱ्यावर हसू फुलविले. छायाचित्रात राजाभाऊ गुळभिलेसह जिव्हाळा शहरी बेघर निवारा केंद्रातील रहिवाशी दिसत आहेत. विशेष म्हणजे या बेघर लोकांच्या हातात राष्ट्रध्वज पाहून इतरांचेही चेहरे आनंदाने फुलले. हमखास राजाभाऊ गुळभिले अनाथांसाठी नेहमीच मदतीला तत्पर असतात. स्वातंत्र्यदिनीही त्यांनी आपल्या कार्यशैलीतून काही तरी हटके करून दाखविले.**

# नशामुक्तीसाठी एसपी, कलेक्टर,सीइओंसह बीडकर धावले

बीड । दिव्य रिपोर्टर

बीड जिल्हा नशामुक्त व्हावा यासाठी पोलीस विभागाकडून १३ ऑगस्ट ते १७ ऑगस्ट दरम्यान जिल्ह्यामध्ये विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये आज सकाळीच मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण याठिकाणी सकाळी मोठ्या संख्येने मॅरेथॉनसाठी बीडकर जमा झाले होते. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या सकल्पनेतून बीडमध्ये आज नशामुक्तीसाठी पोलीस विभागाने बीडकरांना जे आवाहन केले होते त्या आवाहनाला बीडकरांनी भरभरून प्रतिसाद देत मोठ्या संख्येने बीडकर या अभियानात सहभागी झाले होते. यात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य






कार्यकारी अधिकारी जितिन रहेमान, पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यासह संबंधित विभागाचे प्रमुख अधिकारी यात सहभागी झाले होते. तसेच शिवसंग्रामच्या ज्योतीताई मेटे यांनीसुद्धा यात सहभाग घेतला होता. यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.

मध्यंतरीच्या काळामध्ये बीड जिल्ह्यामध्ये अनेक घटना पहायला मिळाल्या. यामध्ये महाराष्ट्राच्या पटलावर बीड जिल्ह्याला काही लोकांमुळे बदनामीला सामोरे जावे लागले. परंतु यानंतर बीडच्या पालकमंत्रीपदाची जबाबदार स्वत: उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतल्यानंतर बीड जिल्ह्याला प्रामाणिक अधिकारी देण्याचे काम अजितदादा यांनी केले. सध्या जिल्हाधिकारी म्हणून विवेक जॉन्सन, सीईओ जितिन रहेमान, पोलीस अधीक्षक म्हणून नवनीत काँवत हे तिघे जिल्ह्याचा कारभार पाहात आहेत. यामध्ये पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांच्या संकल्पनेतून बीड जिल्ह्यात १३ ते १७ ऑगस्ट दरम्यान जिल्ह्यामध्ये नशामुक्तीसाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आज सकाळी याच अभियानामध्ये जनजागृतीच्या अनुषंगाने मॅरेथॉनचे आयोजनही करण्यात आले होते. या मॅरेथॉनमध्ये बीडकरांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

# पूरसंकटावर , नैसर्गिक आपत्तीवर मात करण्यासाठी प्रशासन सज्ज - जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

बीड । दिव्य रिपोर्टर

महाराष्ट्रात पावसाळ्यातील पूरस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य शासनाचा आपत्ती व्यवस्थापन , मदत व पुनर्वसन विभाग तसेच बीड जिल्हा प्रशासन पूर्णपणे सज्ज झाले आहे . वेळोवेळी भारतीय हवामान विभागाने दिलेल्या इशाऱ्यांच्या पार्श्वभूमीवर , जिल्ह्यातील सर्व यंत्रणांना सतर्कतेचे निर्देश दिले असून , नागरिकांनी सुरक्षिततेसाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी , असे आवाहन प्रशासनाने केले आहे .

पूरप्रवण भागातील नागरिकांनी प्रशासनाशी पूर्ण सहकार्य करावे . नदी , नाले , धरण , तलाव या ठिकाणी जाणे टाळावे . सुरक्षित स्थळी हलण्यास प्रशासनाने सांगितल्यास त्वरित पाऊल उचला , असे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आवाहन केले आहे .

अधिकृत सूचनांचे पालन करा, अफवांवर विश्वास ठेवू नका. महत्त्वाची कागदपत्रे , औषधे , अन्नसाठा आणि पिण्याचे पाणी सुरक्षित ठेवा , असे अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी नमूद केले . तर अंबाजोगाईच्या अपर जिल्हाधिकारी अश्विनी जिरंगे-सोनवणे यांनी इशारा देताना पूराच्या पाण्यातून पायी किंवा वाहनाने जाणे जीवघेणे ठरू शकते . मोबाईल चार्ज ठेवावा , सुरक्षित पाणीच वापरावे , असे सांगितले .

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी प्रशांत वाघमारे यांनी आवाहन करताना पूरस्थिती किंवा आपत्तीच्या





### नागरिकांनी घ्यावी काळजी : प्रशासनाचे आवाहन

प्रसंगी नागरिकांनी घाबरून न जाता तातडीने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा . प्रशासन पूर्णपणे सज्ज असून त्वरित मदत पुरवली जाईल , असे प्रशांत वाघमारे यांनी सांगितले . त्यांचा संपर्क क्रमांक =न्न ९५ ६१ ४९ ९४ ४९ असून याशिवाय यासाठी आपत्कालीन संपर्क क्रमांक १०७७/१०००/ ९९२ असून अधिकृत माहिती एस डी एम ए ऍट महाराष्ट्र यावर मिळेल.यनिमित्ताने हवामान विभागाच्या इशाऱ्यांकडे गांभीर्याने लक्ष द्या . नदी , नाले , तलाव यांच्या पातळीतील बदलावर लक्ष ठेवा . पूराच्या वेळी लहान मुले , वृद्ध , महिलांची विशेष काळजी घ्या , असे शेळके यांनी आवाहन केले . तसेच खालीलप्रमाणे सविस्तर माहिती दिली. बीड जिल्ह्यात मागील २४ तासांत सरासरी १२.६ मिमी पावसाची नोंद झाली असून, आतापर्यंत एकूण ३३१.४ मिमी पाऊस झाला आहे . हा वार्षिक सरासरीच्या तुलनेत ५८.५% इतका आहे. परळी तालुक्यात सर्वाधिक ३१.७ मिमी पाऊस नोंदला गेला असून , वडवणीमध्ये सर्वात कमी म्हणजे १.८ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

महाराष्ट्र व भारतातील पूरस्थिती : महाराष्ट्रात कोकण , पश्चिम महाराष्ट्र , विदर्भ व मराठवाड्यातील घाटमाथा परिसर हे पूरप्रवण मानले जातात . सावित्री , वशिष्ठी , शास्त्री , कृष्णा , पंचगंगा , वारणा , वैनगंगा , पेंच , वर्धा या नद्यांना पावसाळ्यात पूर येतो . तथापि अलीकडील काळात बदलत्या हवामान परिस्थितीत कोणत्याही नदी नाले पुढे यांना अचानक पूर येऊ शकतो. त्यामुळे कोणीही गाफील राहता कामा नये. भारतात आसाम , बिहार , उत्तर प्रदेश , केरळ , ओडिशा या राज्यांत दरवर्षी गंभीर पूरस्थिती निर्माण होते . ब्रह्मपुत्रा , गंगा , महानदी , पेरियार नद्यांच्या काठावरील गावे मोठ्या प्रमाणावर बाधित होतात. पूरकाळात घ्यावयाच्या खबरदारी कशी घ्यावी याबद्दल माहिती देताना श्री शेळके म्हणाले की हवामान खाते व प्रशासनाच्या सूचनांचे पालन करा . पाण्याची पातळी वाढल्यास उंच ठिकाणी स्थलांतर करावे . विजेच्या तारा , खांब , उपकरणांपासून दूर राहावे . दूषित पाणी पिणे टाळा ; उकळलेले पाणीच वापरा . पूराच्या पाण्यात जाणे टाळा . प्राण्यांना सुरक्षित ठिकाणी बांधा . बचाव पथकाच्या सूचनांप्रमाणे वागा.पूर ओसरल्यानंतर घरात परतताना स्वच्छता व निर्जंतुकीकरण आवश्यक आहे . दूषित पाणी व सडलेले अन्न टाळा , असे उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांची सूचना आहे. राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (एस डी एम ए) हे महाराष्ट्रातील आपत्ती व्यवस्थापनाचे प्रमुख प्राधिकरण असून , आपत्तीपूर्व तयारी , बचावकार्य , पुनर्वसन आणि पुनर्निर्माण या सर्व टप्प्यांवर नियोजन व अंमलबजावणी करते . नैसर्गिक आपत्तींसोबतच मानवनिर्मित आपत्तींच्या व्यवस्थापनासाठीही ही संस्था कार्य करते .

# अधिकृत गुंठेवारीला बोगस कागदपत्रांचा विळखा

**नियमाने गुंठेवारीची फीस भरली जाते, गुंठेवारी प्रमाणपत्रावर संबंधित अधिकाऱ्यांची ओरिजनल स्वाक्षरीही असते तरीही ते गुंठेवारी प्रमाणपत्र संशयाच्या विळख्यात**

**उपअधीक्षक भूमिअभिलेख यांनाही अंधारात ठेवून गुंठेवारीचे षडयंत्र सुरू असल्याचा संशय**

जमिनीची गुंठेवारी करून देण्यासाठी ७० ते ८० हजार रुपयांचा दर दलालांना हजारो रुपये देवूनही जमीन मालकाचा होतोय गेम



दिव्य आधार
सोमवार, दि. १८ ऑगस्ट २०२५ (पान-४)

# दलाल आणि काही अधिकारी बनावट गुंठेवारीत अडकल्याची शंका



ग्राऊंड रिपोर्टर
दिव्य आधार
शेख रिजवान
9561840184

**नवनिर्वाचित सीओ शैलेष फडसे यांनी पूर्वी दिलेल्या गुंठेवारी प्रमाणपत्राच्या संचिका तपासण्याची गरज, नगरपालिकेतून अनेक गुंठेवारी संचिका गहाळ झाल्याचा बनाव**

**जमीन विक्री करायची असेल तर नगरपालिकेतून जमिनीचे गुंठेवारी प्रमाणपत्र करून घेणे बंधनकारक आहे म्हणून ग्राहक गुंठेवारी करून घेण्यासाठी दलालांना हजारो रुपये देतात आणि गुंठेवारी करून घेतात**

**बनावट गुंठेवारी प्रमाणपत्राची पोलखोल करणे अत्यंत सोपे आहे, गेल्या वर्षभरात भूमिअभिलेख कार्यालयातून किती जमिनीची मोजणी झाली आणि त्याच वर्षात नगरप्रशासनाने किती गुंठेवारी प्रमाणपत्र दिले जर याचा आढावा घेतला तर मोठी बोगसगिरी समोर येण्याची शंका**

बीड :

नगरपालिका मुख्याधिकारी यांच्या बोगस स्वाक्षरीचे अनेक गुंठेवारी प्रमाणपत्र निदर्शणास आल्यानंतर तत्कालीन सीओ यांनी रजिस्ट्री कार्यालयाला पत्रव्यवहार करून काही सर्वे नंबर देवून कळविले की, या सर्वे नंबरमधील अनेक जमिनीचे गुंठेवारी प्रमाणपत्र बोगस झालेले आहे. या पत्रानंतर बीड रजिस्ट्री कार्यालयात मोठी खळबळ उडाली. तत्कालीन सीओ यांनी रजिस्ट्री कार्यालयाला पत्रव्यवहार करण्यापूर्वी अनेक जमिनीच्या रजिस्ट्री बोगस गुंठेवारी प्रमाणपत्राच्या आधारावर झाल्याचे दिसून येत आहे. जे खरेदीखत बोगस गुंठेवारी प्रमाणपत्राच्या आधारावर झाले असे खरेदीखत खऱ्या अर्थाने रद्द करण्याची गरज आहे. परंतु प्रशासनाने यासंदर्भात कोणताच पाठपुरावा केलेला नाही. तत्कालीन सीओ गुट्टे यांच्या बोगस स्वाक्षरीचा मोठ्या प्रमाणात वापर झाल्याचे दिसून येत असतानाही याप्रकरणी प्रशासनाने कोणतीच गंभीर दखल घेतलेली नाही. अधिकाऱ्यांच्या बोगस स्वाक्षरीने गुंठेवारी प्रमाणपत्र तयार झालेत ही बाब अनेकांच्या निदर्शणास आली. परंतु या पलीकडे जावून गुंठेवारी प्रमाणपत्रात मोठी बोगसगिरी होत आहे. परंतु याकडे अद्यापपर्यंत कोणीच लक्ष दिलेले नाही. सन २०२३ ते २०२५ या कार्यकाळात मोठ्या प्रमाणात जमिनीचे गुंठेवारी नगरपालिकेतून झालेली आहे. विशेष म्हणजे हे गुंठेवारी प्रमाणपत्र अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने तसेच सर्व नियमाचे पालन करून विशेष म्हणजे नगरप्रशासनाला महसूल भरून घेण्यात आलेले आहे परंतु या अधिकृत गुंठेवारी प्रमाणपत्राला बोगस कागदपत्रांचा विळखा असल्याचे स्पष्ट दिसून येत असून याकडे प्रशासनाने विशेष लक्ष देण्याची गरज आहे. गुंठेवारी प्रमाणपत्र घेण्यापूर्वी सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे जमिनीची मोजणी करून घेणे. म्हणून भूमिअभिलेख कार्यालयातून जमीन मोजणीची मोठी प्रक्रिया पार पाडण्यात येते. त्यानंतरच नगरप्रशासन गुंठेवारी प्रमाणपत्र देते. परंतु वरील कार्यकाळात भूमिअभिलेख कार्यालयातील उपअधीक्षक यांनाही अंधारात ठेवून गुंठेवारी प्रमाणपत्र नगरपालिकेतून पारित झाल्याचे दिसून येत असून या ग्राऊंड रिपोर्टींगच्या माध्यमातून दिव्य आधारने गुंठेवारी प्रमाणपत्राची मोठी पोलखोल केली आहे. गुंठेवारी प्रमाणपत्र अधिकृत असले तरी यात कशी बोगसगिरी झाली या वृत्तातून समूजन येईल. विशेष म्हणजे ओरिजनल गुंठेवारी प्रमाणपत्रातूनही ग्राहकांचा गेम झाला यातून हे स्पष्ट होत आहे.

जमिनीची गुंठेवारी करण्यासाठी हमखास जमीन मालक एखाद्या दलालाकडे गुंठेवारी करण्याचे काम सोपवितात. एका प्लॉटची गुंठेवारी करायची असेल तर संबंधित दलाल जमीन मालकांकडून ७० ते ८० हजार अशाप्रकारे दर आकारतो. विशेष म्हणजे संबंधित दलाल अवघ्या मनिभरातच गुंठेवारी प्रमाणपत्र तयार करून देतात. गुंठेवारी प्रमाणपत्र घेण्यासाठी प्रस्ताव दाखल केल्यानंतर सर्व प्रथम भूमिअभिलेख कार्यालयातून जमीन मोजणी करून संबंधित भूखंडावर कोणत्याच प्रकारचे बांधकाम नाही असा अहवाल घ्यावा लागतो. तसेच भूमिअभिलेख कार्यालयातून ऑनलाईन नकाशाही देण्यात येते. भूमिअभिलेख कार्यालयातून जमिनीचा अहवाल व नकाशा घेण्यासाठी ग्राहकांना पाच ते सहा महिने प्रतीक्षा करावी लागते परंतु दलालामार्फत नगरपालिकेत दाखल केलेले गुंठेवारीचे प्रस्ताव अवघ्या महिनाभरातच मंजूर होवून ग्राहकांना गुंठेवारी मिळून जाते. जर ग्राहक थेट नगरपालिकेकडे गुंठेवारीचा प्रस्ताव दाखल करत असतील तर त्या ग्राहकाला मात्र मोठी प्रतीक्षा करावी लागते. यातून असे दिसून येते की, या गुंठेवारी प्रमाणपत्रात दलाल आणि अधिकारी यांचे संगनमत आहे की काय? तसेच ज्याअर्थी भूमिअभिलेख कार्यालयातून जमीन मोजणी अहवाल व नकाशा मिळविण्यासाठी मोठा अवधी लागतो. तर मग दलालामार्फत प्रस्ताव दाखल केल्यानंतर नगरप्रशासन अवघ्या महिनाभरातच गुंठेवारी प्रमाणपत्र कसे देते? यासंदर्भात दिव्य आधारने पाठपुरावा केला तर भूमिअभिलेख कार्यालयातील जमीन मोजणी अहवाल व नकाशा हे बनावट तयार करून गुंठेवारीच्या संचिकेला जोडले जात असल्याचा संशय असून बनावट कागदपत्राचा आधार घेवून नगरपालिकेतून गुंठेवारी प्रमाणपत्र घेत असल्याचे यातून स्पष्ट दिसून येत आहे. विशेष म्हणजे भूमिअभिलेख कार्यालयाला याप्रकरणी कोणतीच माहिती नाही. जर प्रशासनाने मागील एक वर्षाचा गुंठेवारी प्रमाणपत्राचा आढावा नगरपालिकेतून व भूमिअभिलेख कार्यालयातून घेतला तर बनावट कागदपत्राच्या आधारावर देण्यात आलेल्या गुंठेवारी प्रमाणपत्राची मोठी पोलखोल होणार यात काही शंका नाही.

## बनावट गुंठेवारी प्रमाणपत्राची पोलखोल करणे अत्यंत सोपे

मागील एक वर्षात नगरपालिकेत किती जमिनीचे प्रस्ताव गुंठेवारी प्रमाणपत्र तयार करण्यासाठी दाखल झाले तसेच त्याच वर्षात भूमिअभिलेख कार्यालयाने किती जमिनीची मोजणी करून मोजणी अहवाल व नकाशे दिले याचा प्रशासनाने आढावा घेतला तर बनावट गुंठेवारी प्रमाणपत्राची पोलखोल करणे अत्यंत सोपे होईल. उदाहरणार्थ भूमिअभिलेख कार्यालयातून एक वर्षात ४० जमिनीची मोजणी झाली आणि नगरप्रशासनाने १०० जमिनीची गुंठेवारी करून दिली. तर उर्वरित ६० जमिनीची मोजणी कोणत्या कार्यालयातून करण्यात आली. यातून असे स्पष्ट होते की, भूमिअभिलेख कार्यालयातील जमीन मोजणी अहवाल व नकाशा बनावट जोडून उर्वरित ६० जमिनीची गुंठेवारी करून प्रमाणपत्र देण्यात आले. जुना भूमिअभिलेख कार्यालयातील जमीन मोजणीचा अहवाल घेवून त्याच अहवालावरील आवक-जावक क्रमांक दिनांक व काही शासकीय बाबींची पूर्तता करून जुन्या अहवालालाच नवीन अहवाल दाखवून भूमिअभिलेख कार्यालयातील जमीन मोजणी अहवाल व नकाशा यात अशाप्रकारे घोळ केला जातो.

## नगरप्रशासनाने भूमिअभिलेख कार्यालयातील अहवालाची पडताळणी करून का घेतली नाही?

तुकडेबंदी कायदा असल्याने जमिनीची खरेदी-विक्री करायची असेल तर नगरप्रशासनाकडून गुंठेवारी प्रमाणपत्र तयार करून घेणे बंधनकारक आहे. जर गुंठेवारी प्रमाणपत्र नसेल तर जमीन खरेदी-विक्री करता येत नाही. यासाठी गुंठेवारी प्रमाणपत्र हे अत्यंत महत्त्वाचे कागद मानले जाते. मध्यंतरी काही दलालांनी तत्कालीन सीओ यांच्या बोगस स्वाक्षरीचा आधार घेवून अनेक गुठेवारी प्रमाणपत्र तयार केले होते. त्यानंतर बोगस स्वाक्षरी प्रकरणाला काही प्रमाणात लगाम लागले. गुंठेवारी प्रमाणपत्र करून घेण्यासाठी महत्त्वाचे म्हणजे भूमिअभिलेख कार्यालयातून जमिनीची मोजणी करून घेणे, हे अत्यंत महत्त्वाची बाब आहे. परंतु काही दलालांनी भूमिअभिलेख कार्यालयातील कागदच बनावट तयार केले असेल तर ही अत्यंत गंभीर बाब असून बनावट कागदपत्राच्या आधारावर अनेक गुंठेवारी प्रमाणपत्र नगरपालिकेतून पारित झाल्याचे दिसून येते. परंतु नगरप्रशासनाच्या एकही अधिकाऱ्याने गुंठेवारी प्रमाणपत्रासाठी दाखल केलेल्या संचिकेतील भूमिअभिलेख कार्यालयातून दिलेल्या अहवालाची पडताळणी करून घेतली नाही. दलाल आणि काही अधिकारी या बनावट गुंठेवारी प्रमाणपत्रात सामील आहे की काय? असाही संशय यातून निर्माण होत आहे.

## मागील तीन वर्षांच्या गुंठेवारी संचिका तपासण्याची गरज अनेक संचिका गहाळ झाल्याचा बनाव होणार

२०२३ ते २०२५ जून या कार्यकाळात नगरपालिकेतून प्लॉटिंगला देण्यात आलेल्या गुंठेवारी प्रमाणपत्राच्या संचिका तपासण्याची अत्यंत गरज आहे. भूमिअभिलेख कार्यालयातील जमीन मोजणी अहवालच नव्हे तर इतर काही कागदपत्रेही या संचिकेला बनावट जोडल्याची शंका व्यक्त केली जात आहे. नवनिर्वाचित सीओ शैलेष फडसे यांनी या गंभीर प्रकरणाकडे लक्ष देवून वरील तीन वर्षात देण्यात आलेल्या गुंठेवारी प्रमाणपत्राच्या संचिका तपासणीसाठी विशेष पथक स्थापन करून या संचिका तपासणी करण्याची गरज आहे. विशेष म्हणजे ज्या बनावट कागदपत्राच्या आधारावर गुंठेवारी प्रमाणपत्र देण्यात आलेल्या आहेत अशा संचिका गहाळ झाल्याचाही नगरप्रशासनाच्या काही अधिकाऱ्यांकडून बनाव होणार यात काही शंका नाही. यासाठी नगरप्रशासनाने वरील तीन वर्षात गुंठेवारी प्रमाणपत्रात देण्यात आलेल्या लाभार्थ्यांची यादी सर्वे नंबरसह घेवून ती यादी भूमिअभिलेख कार्यालयात देवून संबंधितांचे जमीन मोजणी भूमिअभिलेख कार्यालयातून झालेली आहे का? जर याची शहानिशा केली तर बनावट कागदपत्राच्या आधारावर देण्यात आलेल्या बोगस गुंठेवारी प्रमाणपत्राची मोठी पोलखोल होणार यात काही शंका नाही.

**दलालामार्फत जमिनीची गुंठेवारी केली तर अवघ्या महिनाभरातच गुंठेवारी प्रमाणपत्र मिळून जाते, ग्राहक जर स्वत: गुंठेवारी करण्यासाठी गेला तर त्याला मात्र गुंठेवारी प्रमाणपत्र लवकर मिळत नाही, यातच रहस्य दडलेले असते**

**जमिनीची गुंठेवारी करायची म्हटल्यावर त्यात सर्वात महत्त्वाचे म्हणजे भूमिअभिलेख कार्यालयातून जमीन मोजणी करून त्या भूखंडावर बांधकाम केलेले नाही असा अहवाल व जमिनीचा नकाशा घेतल्यानंतरच नगरप्रशासन गुंठेवारी प्रमाणपत्र करून देते**

**भूमिअभिलेख कार्यालयातील भूखंडावर बांधकाम नसल्याचा बनावट अहवाल व बनावट नकाशा जोडून अनेक गुंठेवारी प्रमाणपत्र देण्यात आले असल्याचा संशय असून जर मागील गुंठेवारी प्रमाणपत्र दिलेल्या संचिका तपासणी केली तर मोठी पोलखोल होण्याची शक्यता**

**भूमिअभिलेख कार्यालयात जमीन मोजणीचे प्रस्ताव दाखल केल्यानंतर तब्बल सहा-सहा महिने जमीन मोजणीसाठी नंबर लागत नाही तर मग अवघ्या महिनाभरातच नगरप्रशासन गुंठेवारी प्रमाणपत्र देते कसे? या सर्व बाबींची पडताळणी करणे गरजेचे**

**अशाप्रकारे बनावट कागदपत्राच्या आधारावर गुंठेवारी प्रमाणपत्र देण्यासाठी नगरपालिकेतील नगररचनाकार, सहाय्यक नगररचनाकार व काही वरिष्ठ अधिकारी सामील असल्याची शंका, चौकशी अंती सर्व सत्य समोर येणारच**

# शहरातील विविध विषयांवर आमदार संदीप क्षीरसागरांनी घेतला नगर परिषदेत आढावा

**बीड । दिव्य रिपोर्टर**

**बीड शहरातील नागरिकांसाठी महत्वाच्या असलेल्या विषयांवर आ.संदीप क्षीरसागर यांनी बुधवारी (दि.१३) रोजी आढावा बैठक घेतली. या बैठकीत शहारातील नागरी प्रश्नांवर सविस्तर आढावा घेऊन महत्वाचे असलेले विविध प्रश्न तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना आ.क्षीरसागर यांनी मुख्याधिकारी आणि नगरपरिषद प्रशासनाला केल्या.**

बीड शहरातील अनेक नागरी प्रश्न प्रलंबित आहेत. याबाबत आ.संदीप क्षीरसागर सातत्याने शासन, प्रशासन स्तरावर पाठपुरावा करत आहेत. या अनुषंगाने बीड नगरपरिषदेच्या स्तरावरील विविध प्रलंबित विषयांवर आढावा घेण्यासाठी बीड नगरपरिषदेचे नवीन मुख्याधिकारी शैलेश फडसे आणि प्रशासनातील अधिकारी यांच्यासमवेत आ.संदीप क्षीरसागर यांनी बैठक घेऊन, सविस्तर चर्चा करून आढावा घेतला. तसेच बीड शहरातील नागरिकांसाठी महत्वाचे असलेले विविध प्रश्न प्रशासकीय स्तरावरून तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना आ.संदीप क्षीरसागर यांनी मुख्याधिकारी आणि नगरपरिषद प्रशासनाला केल्या आहेत. या बैठकीस माजी आ.सय्यद सलीम, बीड नगरपरिषदेतील विविध विभागांचे अधिकारी





**महत्वाचे विषय तातडीने मार्गी लावण्याच्या दिल्या सूचना**

उपस्थित होते.

बैठकीत चर्चा झालेले मुद्दे

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची उंची वाढवणे व सुशोभीकरण करणे, चालू असलेल्या विविध विकासकामांची सद्यस्थितीचा आढावा घेतला, शहरातील स्वच्छता व पाणी पुरवठा बाबत आढावा., बीड शहरातील पार्किंग व्यवस्था करणेसाठी प्रस्तावित जागा ३७ (ए) प्रस्तावावर निर्णय, घरकुल योजना, विद्युत पुरवठा तसेच सार्वजनिक शौचालय उभारणीबाबत आढावा घेतला, पेठ बीड भागातील मच्छी मार्केट इमारत व जुनी भाजी मंडई येथील मटन मार्केट इमारत तसेच सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स येथील भाजी मंडई इमारती बाबत आढावा घेतला, उर्दूघर च्या उभारणीसाठी जागा निश्चित करणे, कोंडवाडा नूतनीकरण बाबत आढावा घेतला, STPT श्रिरपीं बाबतच्या कामाचा आढावा घेतला., मोकाट जनावरांसाठी नुतन कोंडवाडा तयार करणे, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी दलितवस्ती योजनेतंर्गत अनेक विकास कामांना मंजुरी देण्याबाबत चर्चा केली.

### शहरातील प्रलंबित ठेवलेले प्रमुख रस्ते ना.अजितदादांच्या पुढाकारातून लवकरच होणार

बीड शहरातील प्रमुख असलेले छत्रपती शिवाजी महाराज चौक-राजूरी वेस-बलभीम चौक-धोंडीपुरा-सुभाष रोड, राजूरीवेस-बुंदेलपुरा-कटकटपुरा-सुभाष रोड, कारंजा-पिंगळे गल्ली-बुंदेलपुरा, नगर नाका ते पालवण चौक, राजू नगर ते अंकुश नगर या प्रमुख रस्त्यांच्या कामाला ना.अजित दादा पवार यांच्या पुढाकारातून लवकरच प्रत्यक्षात सुरूवात होणार आहे. दरम्यान हे सर्व रस्ते ३ वर्षांपूर्वीच मंजूर झालेले आहेत. परंतु तात्कालीन पालकमंत्री यांनी जाणीवपूर्वक, श्रेयवादातून बीड शहरातील रस्त्यांचे काम प्रलंबित ठेवण्याचे नियोजन केले होते. परंतु ना.अजित दादा पवार यांनी बीड शहराचा जिव्हाळ्याचा प्रश्न लक्षात घेता तातडीने हे रस्ते करण्याच्या सूचना दिल्या असून लवकरच या रस्त्यांच्या कामाला प्रत्यक्षात सुरूवात होणार आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक शेख रिजवान खलील यांनी माऊली ऑफसेट माळीवेस, बीड ता. जि. बीड ४३१ १२२ येथे छापून साप्ताहिक दिव्य आधार कार्यालय बशीरगंज, जयहिंद प्लाझा, नगरपालिकेजवळ, बीड ता. जि. बीड ४३१ १२२ येथे प्रकाशित केले आहे. मो. ९५६१८४०१८४ या अंकामधील प्रत्येक बातमी व लेखास संपादक सहमत असतीलच असे नाही, वाद-विवाद बीड न्यायालय अंतर्गत.